जावक क्रमांक. ८०५७/२०१८.
लष्कर पोलीस स्टेशन,पुणे.
दिनांक –१७/१० /२०१८.

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी सो.

पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर.

यांना सविनय सादर ..

प्रतिवेदक - आर.एच.सय्यद पो.हवा.६४०३,लष्कर पोलीस स्टेशन पुणे शहर.

यांजकडुन विनंतीपुर्वक..

विषय - अनोळखी मयत इसमाची माहीती सर्व वर्तमानपत्रात प्रसिध्द होणेबाबत..

वरील विषयान्वये सादर करतो की, ,लष्कर पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि.नंबर ४७/२०१८ सी.आर.पी.सी. १७४ मधील खबर देणार इसम नामे राजु ईब्राहीम शहा वय -४७ वर्षे,धंदा-ड्रायव्हर रा.१६,सोलापूर बाजार कॅम्प पुणे. यानी दि.०९/१०/२०१८ रोजी १२.०० वा.चे सुमारास समक्ष आम्हास सोलापुर बाजार पोलीस चौकीस येऊन कळवीले की, एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ५२ वर्षे हा कॅनॉलमध्ये पाण्यावर तरंगत आहे. अशी खबर दिल्याने आम्ही स्वतः सदर ठिकाणी जाऊन कॅन्टोन्मंट फायरब्रिगेडच्या सहाय्याने अनोळखी पुरुष इसमास पाण्यातुन बाहेर काढुन त्यास कॅन्टोंन्मेंन्ट ॲम्ब्युलन्समधुन ससुन हॉस्पीटल पुणे येथे उपचाराकामी नेली असता ते डॉक्टर तपासणीपुर्वीच मयत झाल्याचे डॉक्टारांनी एम.एल.सी.नं.२२९५७/१८ ने घोषीत केले. मयतावर ससुन डेड हाऊस येथे एमएलपीएम नं. ५०८९/१८ अन्वये पोस्टमार्टम झाले आहे. मयताचे वर्णन खालीलप्रमाणे.

एक अनोळखी पुरुष जातीचे मयत वय अंदाजे ५२ वर्षे,नाव पत्ता माहीत नाही.ऊंची अंदाजे ५ फुट २ इंच, चेहरा गोल,नाक बसके,डोकीचे केस काळे व अर्धवट टक्कल पडलेला, डाव्या हाताचे पेटरीवर दोन बारीक बदामाचे चिन्ह व त्यामध्ये इंग्रजी अक्षरात (s.y) अशी अक्षरे व बाण गोंदलेले आहेत उजव्या हाताचे पोटरीवर रेषांका व पद्मावती असे गोंदलेले आहे.

येणेप्रमाणे वरील वर्णनाची अनोळखी इसमाची मयत बॉडी मिळुन आली आहे.तरी वरील अनोळखी मयत इसमाचे वारसाचे तपासकामी त्याची माहीती सर्व वर्तमानपत्रात प्रसिध्द होणेस विनंती आहे.

मार्फत रवाना.
मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो.
लष्कर पोलीस स्टेशन पुणे शहर.

मा.सा.व्हावे.
दि.१७ /१०/२०१८.
(सही) HC6403
पोलीस हवालदार ६४०३
लष्कर पोलीस स्टेशन पुणे.

(सही) व.पो.नि.
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
लष्कर पोलीस स्टेशन,पुणे.